

निवडणुकीतील घोटाळा
प्रेमसिंह नेगी
अनुवाद : रवींद्र ठाकूर
₹ 14.00
ISBN 978-81-237-3587-0
नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

*नवसाक्षर साहित्यमाला*

# निवडणुकीतील घोटाळा

**प्रेमसिंह नेगी**

अनुवाद
**रवींद्र ठाकूर**

चित्रे
**प्रबीर कुमार सेनगुप्त**

NBT INDIA

**नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया**

प्रौढ शिक्षण संचालनालय, मध्यप्रदेश ह्यांच्या सहकार्याने भोपाळ येथे आयोजित केलेल्या कार्यशाळेत ह्याचे मूळ हिंदी पुस्तक तयार करण्यात आले.

ISBN 978-81-237-3587-0

प्रथम प्रकाशन : 2001 *(शके 1923)*
पहिली आवृत्ती : 2004 *(शके 1926)*
दुसरी आवृत्ती : 2013 *(शके 1934)*
मूळ © प्रेमसिंह नेगी
मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 2001
Chunavi Chakkar *(Marathi)*

**₹ 14.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
नेहरू भवन, 5 इन्स्टिट्युशनल एरिया, फेज-II
वसंत कुंज, नवी दिल्ली-110 070 यांनी प्रकाशित केले.

देवीपूर हे एक मोठे गाव आहे. या गावचे सरपंच आहेत चालूराम. या असामीचे खरे नाव काही वेगळेच असावे. परंतु चालूगिरी अंगात अगदी मुरलेली आहे ना. म्हणून चालूराम हेच नाव रुळले आहे. किती निवडणुका आल्या अन् गेल्या. पण गावचा सरपंच काही बदलला नाही. दरवेळी चालूराम नवा डाव टाकतात. आणि कसेही करून निवडून येतातच. म्हणून तर सारे देवीपूर त्यांना चालूराम या नावानेच ओळखते.

आता परत निवडणुका होणार आहेत. चालूरामना सरपंचपद हा एक धंदाच वाटतो. सरपंचपद हे पैसे मिळवायचे एक साधन. यासाठी ते याही वेळेस निवडणुकीला उभे राहणार आहेत. पण यावेळी गावातील लोकांनी एक चंग बांधला आहे. त्यांना चालूराम नको आहेत. कारण त्यांनी गावासाठी काहीही केलेले नाही. सरकारकडून विकासासाठी

निधी येतो. तो चालूराम हडप करतात. सरकारला विकासाचा खोटानाटा अहवाल पाठवून देतात. या कटात त्यांनी इतरांनाही सामील केले आहे.

याबाबत एकदोनदा गावकऱ्यांनी तक्रार देखील केली. पण तिची कोणी दाद घेतली नाही. बिचारे साधेभोळे गावकरी. ते हात चोळत बसले. ते याहून अधिक काही करू शकले नाहीत.

सुदैवाने याच सुमारास भोळेनाना गावी परतले. भोळेनाना मूळचे देवीपूरचेच. इथेच जन्मले आणि वाढले. परंतु सरकारी नौकरीमुळे ते नेहमी बाहेरच राहिले. आता ते सेवानिवृत्त होऊन गावी परतले आहेत. नानांना आपले गाव फार आवडते. त्यांना राहिलेले दिवस शांतपणे गावात घालवायचे आहेत.

ते गावी परतले खरे. परंतु पाहतात तो काय? आपला गाव होता तसाच आहे. कुठलीही सुधारणा झालेली नाही. ते कानोसा घेऊ लागले. गावकरी भोवती जमू लागले. चालूरामच्या कारवायांची कहाणी त्यांच्याही कानावर आली. ते ऐकून भोळेनानांना फार वाईट वाटले. गावकऱ्यांनी नानांना विनंती केली, "तुम्हीच सरपंचपदासाठी उभे राहा. चालूरामपासून





गावाची सुटका करायला हवी." खरे तर नानांना निवडणुकीची भानगड नकोच होती. परंतु एकीकडे गावचा विकास असा तुंबलेला, दुसरीकडे गावकरी मंडळींचा हा धोशा. नानांना आपले राहिलेले दिवस

निवांतपणे घालवायचे होते. परंतु एकीकडे निवडणूक. दुसरीकडे या मंडळींचे प्रेम. ते चांगलेच कैचीत सापडले.

इकडे भोळेनाना सरपंचपदासाठी उभे राहतील अशी चालूरामनी अटकळ बांधलेलीच होती–पण ते पडले हिकमती. संधी मिळताच कपट साधणारे. ते बढाया मारीत, "अरे मी असातसा कुणाला भिणारा माणूस नाही. निवडणुकांत मतांचं काय काम? निवडणूक तर पैशाने जिंकली जाते. पैशाचा मोह कोणाला सोडवतो? मोठेमोठे बळी पडतात. तो भोळेनाना नुसताच भोळोबा आहे. निवडणुकांचं राजकारण त्याला काय गमणार?

दुसरे दिवशी चालूराम भोळेनानांना भेटायला गेले. नानांनी निवडणुकीला उभे राहू नये म्हणून मनधरणी करू लागले. साखरपेरणी करू लागले.

भोळेनाना म्हणाले, "जमलं. मी निवडणुकीला उभा होणार नाही. पण माझी एक अट आहे. आपणही उभे होऊ नये."

ही अट चालूरामना कशी काय रुचणार? शेवटी त्यांनी भोळेनानांना पैशाची लालूच दाखवली. पण





नानांनी सरळ नकार दिला. हा माणूस पैशाला बधणारा नाही हे चालूरामनी ओळखले. त्यांनी भोळेनानांचा निरोप घेतला.

बाहेर पडतांना ते म्हणाले, ‘‘खरे तर हे पैसे तुम्हाला नुसतेच देऊन टाकणार होतो. पण तुम्ही वेडे आहात. घरी आलेली लक्ष्मी लाथाडता आहात. लक्षात ठेवा, याची तुम्हाला फार मोठी किंमत मोजावी लागेल. निवडून यायला कितीही आटापिटा करा. काही पदरी पडणार नाही. ही निवडणूक मीच जिंकणार. ही काळ्या दगडावरची रेघ. दर वेळी मीच जिंकत आलोय. निवडणूक जिंकणं हा माझ्या हातचा खेळ आहे. आणखी हेही समजून असा— एखादं काम सरळपणे होत नसेल तर ते कसं करवून घ्यावं हेही मी जाणतो.’’

चालूराम निघून गेले. पण जातांना भोळेनानांची घालमेल दूर करून गेले. त्यांनी ठरविले निवडणुकीला उभे राहायचेच. गावकऱ्यांच्या मदतीने चालूरामना खडे चारायचे. गावकरी मंडळींना हीच आस होती. भोळेनाना गावासाठी काहीतरी चांगले करतील असे वाटत होते. ही आस पुरी करायचीच असे नानांनी ठरविले.



हळूहळू निवडणुका जवळ आल्या. एकीकडे चालूराम. दुसरीकडे भोळेनाना. अटीतटीची लढत सुरू झाली. चालूराम यांनी काहींना पैशाचे आमिष दाखवले. काहींना धाक. अनेक लटपटी खटपटी केल्या. असे करून शंभरातले तीसेक मतदार आपल्याकडे वळवून घेतले. पण बाकीचे—जवळ जवळ दोन तृतियांश मतदार अजून गळाला लागले नव्हते.

पण चालूराम हा सहजासहजी माघार घेणारा माणूस नव्हता. त्यांनी आपला शेवटचा डाव टाकायचे ठरविले. बाहेरगावचे गुंड बोलाविले. मतदान केंद्रावर ताबा मिळवायचा होता. मग ही सगळी तयारी हवीच, नाही का? त्यांनी शेवटी आपला डाव टाकलाच. खरे तर हे इतके सोपे नव्हते. पण चालूराम बारा गावचे पाणी पचवलेला माणूस. तो बेरड होता. आपला हेतू पुरा करायला त्याने एक खास चीज पैदा केली होती. ती म्हणजे मतदानासाठी बोटावर लावायची शाई. ही शाई लवकर पुसली जात नाही. नेमकी तीच त्याने मिळविली होती.

ती निवडणुकीची आदली रात्र होती. सगळा डाव रचला गेला. योजनेनुसार गुंड तयार झाले—पण

अंगावर वेश सरकारी कर्मचाऱ्याचा. ते गावकुसाबाहेरील दलित वस्तीत शिरले. वस्ती गावचीच. पण तरीही गावापासून थोडी दूर!

झालूरामचे गुंड घराघरात शिरू लागले. बोटाबोटाला शाई लावू लागले. लोकांनी हे असे का म्हणून विचारताच ते बोलले कसे, "आम्हाला सरकारनेच पाठवलंय. निवडणुकीसाठीच इथे आलोय. या गावचं



निवडणुकीचं काम सरकारने आमच्यावर सोपवलंय. यावेळी आम्ही घरोघरी जाऊन मत घेत आहोत. तुम्ही ज्याला मत देणार ते नाव आम्ही नोंदून घेऊ. बस. एवढं झालं की त्यालाच तुमचं मत मिळेल.''

हे ऐकून गावकरी बोलले, ''साहेब आमची मतं भोळेनानांना. घ्या लिहून. यावेळी चालूरामना आमचं मत मिळणार नाही. दर निवडणुकीत ते सांगतात, गावचा विकास करू, पिण्याचे पाणी आणू, शेतीसाठी कालवा आणू, शाळा उघडू, अशी मधाची बोटं लावतात. पण बोलाचीच कढी. निवडणूक आटपली की सगळं विसरून जातात. किती वर्षं झाली. हा माणूस असाच झुलवतोय बघा.''

गुंड म्हणाले, ''ती काळजीच नको. तुमची मतं भोळेनानांना पोचलीच समजा. आता मत देण्यासाठी शाळेत जायची गरज नाही.''

साधीभोळी माणसे ती. या भूलथापांना सहज बळी पडली. चालूरामची चालूगिरी खरोखर सफल झाली. त्यामुळे ते अगदी ऐटीत फिरू लागले. कारण त्यांना ठाऊक होते, की भोळेनानांची दलित वस्तीतली मते वाया गेलीत. इतकी मते वाया गेलीत. मग आता



भोळेनाना कुठून निवडून येणार? चालूरामना आकाश ठेंगणे झाले.

दुसरा दिवस उजाडला. मतदानाची वेळ येऊन ठेपली. सगळे लोक मतदानाला गेले. पण दलित वस्तीतील कुणी दिसेना. भोळेनाना काळजीत पडले. वस्तीत गेले. लोकांना विचारू लागले, ''का आला नाहीत?'' लोकांनी सांगितले, ''अहो नाना, आम्ही तर कालच मतदान केले. ही पाहा बोटावर मतदानाची शाई आहे.''

हे ऐकून भोळेनाना चकित झाले. त्यांनी सगळी कहाणी ऐकून घेतली. चालूरामची ही कपटी खेळी पाहून ते अवाक झाले. वस्तीतील लोकांनी भोळेनानांना सगळा प्रकार सांगितला. पुन्हा एकदा चालूरामने कावा साधला होता.

वस्तीतील लोक जागे झाले. आपण फसवले गेलोत हे त्यांना कळून चुकले. ते चांगलेच संतापले. काही तरुण तर जीवावर उदार झाले. परंतु नानांनी त्यांची समजूत घातली. ते म्हणाले, भांडणतंटा, दंगेधोपे बरे नव्हेत. आपण कायदेशीरपणे लढा देऊ. मतदान हा तुमचा अधिकार आहे. तो कुणीही हिरावू शकत

नाही. यासाठी जे जे करावे लागेल ते आपण करूच. पण शांततेने पुढे जावे लागेल.''

भोळेनाना सरकारी अधिकारी होते. कैक निवडणुकांचे त्यांनी काम केले होते. नियमावर बोट ठेवता लोकांची मतदानाची संधी गमावली हे जाणत होते. कारण बोटांवर शाईची खूण होती. त्यांनी मतदान केले आहे याचा तो धडधडीत पुरावा होता. पण नेमका तोच तर कावा होता. बिचारे दलित चांगलेच ठकवले गेले होते.

काहीही होवो, शेवटी विजय सत्याचाच अशी नानांनी मनाशी खूणगाठ बांधली. लढायचे ठरविले. ते तातडीने वस्तीतील लोकांना सोबत घेऊन निघाले. निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यांना सगळी कहाणी सांगितली.

निवडणूक अधिकारी चांगले होते. ते लगेच मतदान केंद्राकडे निघाले. मागोमाग भोळेनाना मतदारां-समवेत निघाले.

निवडणूक अधिकाऱ्यांनी कसून चौकशी केली. भोळेनानांची तक्रार बरोबर आहे हे त्यांना पटले. खरोखर लोकांची फसवणूक झालेली होती. लोकांना मतदानाचा अधिकार परत मिळवून देणे गरजेचे होते.





निवडणूक अधिकारी म्हणून त्यांचे ते कामच होते. त्यांनी लेखी आदेश दिला, ''या लोकांच्या दुसऱ्या बोटावर शाई लावावी. त्यांना मतदानाचा हक्क बजावू दिला पाहिजे.''

अशारीतीने लोकांना मतदानाचा अधिकार मिळाला. आदेशानुसार बोटांना परत शाई लावली गेली. मतदान पार पडले.

शेवटी सत्याचा विजय झाला. चालूरामची चालूगिरी वाया गेली. भोळेनाना प्रचंड बहुमतांनी विजयी झाले. चालूरामची अनामत रक्कम जप्त झाली.

देवीपूर गाव आजवर विकासाला पारखा झालेला होता. आता तिथे आशेचे किरण उजळू लागले.

Printed at Tarang Printers, F-40, Site "C", Surajpur Industrial Area, Greater Noida (U.P.)